पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

<u>कार्यपत्रिका क्रमांक १४</u>

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ६/७/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **<u>स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

विषय क्र. ४५७

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/५/२०२१ ते दि. ३१/५/२०२१ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/१७३२ दि.२३/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४५८

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे मे २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. १४५० दि.२९/६/२०२१ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

विषय क्र. ४५९

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. २५/६/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | पुणे मनपा अंदाजपत्रक सन २०२१-२२ मधील बजेट कोड क्र. CE26A336/SU1-1407 प्रभाग क्र.१९क, सेव्हन ल्व्हज पुलाखाली राजमाता जिजाऊ उद्यान येथे दुरूस्ती विषयक कामे करणे. | १० लक्ष | – |
| | नवीन सुचविलेली कामे | | |
| १. | प्रभाग क्र.१९ भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा-या आरोग्य कोठी मध्ये दुरूस्ती विषयक कामे करणे व साहित्य खरेदी करणे. | – | ०५ लक्ष |
| २. | प्रभाग क्र.१९ मनपा शाळेमध्ये संगणक पुरविणे. | – | ०५ लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र. ४६०

मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि. २९/६/२०२१ चे पत्र.

रामटेकडी स.न.९४,टी.पी.II, प्लॉट क्र.८८वर पुणे बायो एनर्जी या कंपनीच्या कच-यापासून विजनिर्मिती या (S.P.V.) प्रकल्पाबाबत मंजुरी देताना, एकतर्फी करारनामे करताना, नुकसान भरपाईबाबत रक्कम ठरविताना तसेच बेकायदेशीरपणे ठरविण्यात आलेली ८९ कोटी नुकसान भरपाई रकमेपैकी ३२ कोटी रक्कम तीन बिलांद्वारे अदा करताना झालेला भ्रष्टाचार दि. ०८/०६/२०२१ रोजी मा.आयुक्त यांचे लेखी निदर्शनास आणला होता तथापि त्यावर त्वरित कार्यवाही करणे अपेक्षित असताना दुर्दैवाने महानगरपालिका प्रशासन जाणीवपूर्वक वेळकाढूपणा करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेने ५०० टी.पी.डी क्षमतेचा प्रकल्प उभा करणेसाठी पुणे बायोएनर्जी या कंपनीसोबत करारनामा केला असताना जागा बदलामुळे होणारी नुकसान भरपाई रक्कम मात्र ७५० टी.पी.डी.क्षमतेचा प्रकल्प गृहीत धरून काढण्यात आली तसेच टीपींग फी मध्ये सुद्धा दरवर्षी ८ टक्के इतकी भरमसाठ वाढ मान्य करण्यात आली. त्यासाठी दि.२०/०२/२०१८ रोजी मा.स्थायी समिती व मुख्य सभेची मान्यता घेताना खोटी निवेदने मान्यतेकरता ठेवण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. सन २०१५ ते सन २०२१ आजरोजीपर्यंत निव्वळ सिमाभिंत बांधून (२४ लाख रूपये खर्च करून) कथीत नुकसान भरपाईपोटी ८९ कोटी रूपये मान्य करण्याव्यतिरिक्त पुणे बायोएनर्जी व घनकचरा विभागातील अधिकारी अद्यापही प्रकल्प उभारणीचे ३० टक्के ही काम करू शकले नाही,ही वस्तुस्थिती आहे.

सदर बाब ही फौजदारी गुन्ह्यास पात्र असल्याने प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेची झालेली फसवणूक व आर्थिक नुकसानीबाबत मा.आयुक्त यांना कारवाई करणेबाबत आदेश देण्यात यावेत.

विषय क्र. ४६१
मा.आबा बागुल यांचे दि. ३०/६/२०२१ चे पत्र.

महापालिकेचे घटते उत्पन्न पाहता व कोरोनाच्या पार्श्वभूमीवर होणारा खर्च, तसेच ८ हजार कोटीहून अधिक रकमेचा सादर केलेला अर्थसंकल्प पाहता पुणे महापालिकेचे उत्पन्न वाढविणे तसेच खर्चात बचत करणे आपले कर्तव्य आहे. महसूली खर्च प्रतिवर्षी वाढत असून यावर लक्ष केंद्रित करून अनावश्यक खर्च थांबवावा.

समान पाणीपुरवठा योजना राबविणेसाठी पुणे महापालिकेने २०० कोटी रकमेचे बॉण्डस कर्ज स्वरूपात उभे केले असून यापोटी कोटयावधींचे व्याज महापालिकेस भरावे लागत आहे. एका बाजूला महापालिकेच्या तिजोरीत रक्कम शिल्लक असून कोटयावधींच्या रकमेच्या मुदत ठेव महापालिकेने केलेल्या आहेत. सदर मुदत ठेव या ३ टक्के दराने असून त्यापोटी महापालिकेस व्याज मिळत आहे. तसेच पुणे महापालिकेने २०० कोटी रकमेचे बॉण्डस कर्ज स्वरूपात घेतलेले असून त्याचे व्याज ७.५० टक्केच्या जवळपास महापालिका भरत आहे. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असून महापालिकेचे मुदत ठेवीमधून जरी कर्ज उचलेले तरी प्रतिवर्षी महापालिकेचे कोटयावधी रूपये वाचणार आहेत. महापालिकेचे आर्थिक नुकसान निदर्शनास आल्यावर नुकसान थांबविणे आवश्यक आहे.

तरी पुणे महापालिकेचे आर्थिक नुकसान थांबविणेसाठी सदर प्रकरणी तातडीने निर्णय करावा.

विषय क्र. ४६२
मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि. ३०/६/२०२१ चे पत्र.

पुणे शहर हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने, वास्तव्याने पावन झालेली ही भूमी आहे.

श्री शिव छत्रपतींचे देशाच्या ऐतिहासिक वारसामध्ये असलेले अनन्य साधारण महत्व लक्षात घेता, पुणे मनपा मध्ये नव्या पिढीला प्रेरणास्थान म्हणून श्री छत्रपती शिवरायांचा अर्धपुतळा किंवा अश्वारुढ पुतळा पुणे महानगरपालिकेच्या नवीन इमारतीच्या दर्शनीय जागी बसविण्यात यावा.

या प्रकल्पाला लागणारा सर्व निधी अर्थसंकल्पीय तरतुदीमधून विशेष बाब म्हणून वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करण्यात यावा.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. ४६३

कात्रज कोंढवा रस्ता राजस सोसायटी चौक ते शत्रुंजय मंदिर ते खडी मशीन चौक ते पिसोळी गाव मनपा हद्दीपर्यंत ८४ मी. डी.पी. रस्ता विकसन करणे या कामासाठी पोस्ट टेंडरच्या उर्वरित ॲक्टीव्हिटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजनसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.पी. एफ. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु.१९२,४३,५४,०००/– टेंडर रक्कमेच्या ०.८५% दराने र.रु. १,६३,५७,००९/– पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२७० दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४६४

घनकचरा विभागामार्फत उरुळी कचरा डेपो येथे उभारण्यात येत असलेल्या २०० टन प्रति दिन क्षमतेच्या प्रकल्पासाठी विद्युत पुरवठा करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु सोलर इलेक्ट्रीकल्स् ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.८९,२८,४९५/- पेक्षा ११.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८,५७,९६८=४५ अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये ९,४२,९५६=२१ असे एकूण र.रुपये ८८,००,९२४=६६ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२७३ दि.२९/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४६५

Carrying out O&M Work of katraj-3 & katraj-4 Biomethanation Plant (To Process Segregated Organic Biodegradable Municipal Solid Wastes) having capacity of 10 TPD (5+5) for a Period of 3 Years Installed at Katraj, Pune कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मेलहेम आयकोस प्रा.ली.यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे(टेंडर र.रु.९५,१२,६३०/- पेक्षा ५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९,८८,२६१=५० सर्व करांसहित पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२७६ दि. २९/६/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

विषय क्र. ४६६

मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २२/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.९ ब बाणेर हॉटेल सदानंद ते ननावरे अंडरपास, हायवेची पूर्व बाजू, सर्व्हिस रोड सुशोभिकरण करणे, झाडे लावणे, माती टाकणे, पाण्याची व्यवस्था करणे इत्यादीसाठी र.रु.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| प्रभाग क्र.९ ब, आयव्हरी इस्टेट बाणेर येथील रस्ता डांबरीकरण करणे, सीई२०ए१०२/एसए२-१०३० | ५० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.९ ब बाणेर हॉटेल सदानंद ते ननावरे अंडरपास, हायवेची पूर्व बाजू, सर्व्हिस रोड सुशोभिकरण करणे, झाडे लावणे, माती टाकणे, पाण्याची व्यवस्था करणे इत्यादी. | -- | ५० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनी करावा असे दि. ४/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ४६७

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २८/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्तीची कामे करणे, गाडलेले चेंबर वर घेणे, झाकण बदलणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. ३३, कोड एक्सई२३अे११७/ एसएक्स२-९२, वॉर्ड १ सी प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी नाले साफसफाई करणे | १० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्तीची कामे करणे, गाडलेले चेंबर वर घेणे, झाकण बदलणे | -- | १० लाख |

(टिप :- मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर सदर कामाचे टेंडर लावण्यात यावे.)

(टिप : सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनी करावा असे दि. ४/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.